सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**

**नगर रचना संचालनालय**

**तळमजला, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१**

**दूरध्वनी क्र. ०२०-२६१२२६०३/२६१२२०७६** Email ID: **dirtpvd.pune@maharashtra.gov.in**

**ddtp.ho@maharashtra.gov.in** **do_tpv2@rediffmail.com**

---

**विकास योजना पुलगाव, जि. वर्धा.**

मौजा गुंजखेडा. ता.देवळी, जि. वर्धा, स.क्र. ४५५अ या जमिनीवरील आ.क्र. २३, "भाजी बाजार व दुकानकेंद्र" या आरक्षणाबाबत.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२७(२) बाबतचे आदेश निर्गमित करणेबाबत.

जा. क्र. डिटीपी/वि.यो. पुलगाव/ कलम १२७(२)/आदेश/टिपीव्ही-२/५२१८ दि.२७.०९.२०२४.

**शासन निर्णय:-** सोबतचे आदेश (मराठी व इंग्रजी) महाराष्ट्र शासन राजपत्रात (नागपुर विभागीय पुरवणीमध्ये ) प्रसिध्द करावेत.

(मसुदा मा.संचालक, न.र. यांनी मंजूर केला आहे.)

**(सुदर्शन सि. गाडळकर)**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरीता

**प्रति,**

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, नागपूर.

/- त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतचे आदेश (मराठी व इंग्रजी) महाराष्ट्र शासन राजपत्रात (नागपुर विभागीय पुरवणीमध्ये) प्रसिध्द करून त्यांच्या प्रत्येकी ५ छापील प्रती या कार्यालयास व प्रत्येकी २ छापील प्रती सहसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपुर आणि सहायक संचालक, नगर रचना, वर्धा शाखा, वर्धा यांना पाठवाव्यात.

**प्रत माहितीस्तव :-**

१) मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, (नवि-०९) मंत्रालय, मुंबई-३२.
२) मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग नागपूर.
३) सहसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर.

(कृ.मा.प.)

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तव:-**

४) उपसंचालक, नगर रचना नागरी संशोधन घटक, मुख्य कार्यालय, पुणे.

/- त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदरचे आदेश अभिलेखार्थ त्यांचेकडील त्यासंबंधीच्या संकलन नस्तीमध्ये जोडावी. तसेच सदरचे आदेश संचालनालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर देखिल प्रसिध्द करावी.

५) जिल्हाधिकारी,वर्धा.

६) सहायक संचालक, नगर रचना, वर्धा शाखा, वर्धा.

/-सोबतच्या आदेशानुसार अधिप्रमाणित कारावयाचे भाग नकाशे पाच प्रतीत तयार करुन अधिप्रमाणित करण्यासाठी संचालनालयास उलटटपाली सादर करण्यात यावेत.

७) मुख्याधिकारी, पुलगाव नगर परिषद, पुलगाव, जि. वर्धा.

८) प्रमुख आरेखक, रेखाकला विभाग, मुख्य कार्यालय, पुणे.

/- सदर आदेशानुसारचा फेरबदल मुख्य कार्यालयातील विकास योजना नकाशावर दर्शवून तो अद्यावत करावा.

९) अर्जदार ॲड. जि. के. मुंधडा, पारश्री हॉस्पिटल समोर, खापर्डे बगिचा, अमरावती, जि. अमरावती- ४४४६०२.

**महाराष्ट्र शासन**
**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**तळमजला, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१**

**आदेश**

जा.क्र.डि.टी.पी./वि.यो.पुलगाव/कलम-१२७(२)/आदेश/टिपीव्ही-२/ ५२१७ दि. २७.०९.२०२४.

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६**

ज्याअर्थी, पुलगाव नगर परिषदेची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे "**उक्त अधिनियम**" असे संबोधिले आहे) चे कलम ३१(१) चे तरतुदीनुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना टिपीएस-२६९६/७७१/सीआर-२४२/९६/युडी-९, दि.१४.०३.१९९७ अन्वये (यापुढे **"उक्त अधिसूचना"** असे संबोधिले आहे.) भागशः मंजूर केली असून, ती दि.१९.०५.१९९७ पासून अंमलात आलेली आहे (यापुढे **"उक्त मंजूर विकास योजना"** असे संबोधिले आहे) व वगळलेल्या भागाची विकास योजना शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-२६९६/७७१-अ व ब/सीआर-२४२/९६/नवि-९, दि.२९.०२.२००० अन्वये भागशः मंजूर केली असून ती दि.०१.०६.२००० पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेनुसार, मौजा **गुंजखेडा** येथील स.क्र. ४५५-अ (जुना स.क्र. २१४ भाग) या जमिनीचे ३१०० चौ.मी. क्षेत्र हे आ.क्र. २३, "व्हेजिटेबल मार्केट व शॉपिंग सेंटर" (एकुण क्षेत्र ०.३१ हे.) या आरक्षणाने बाधित होत असून (यापुढे **"उक्त आरक्षण"** असे संबोधिले आहे) उक्त आरक्षणाच्या भुसंपादन व विकासासाठी नियोजन व समुचित प्राधिकरण नगर परिषद, पुलगाव आहे (यापुढे **"उक्त समुचित प्राधिकरण"** असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त मंजूर विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षाच्या कालावधीत उक्त आरक्षणांखालील जमीन संपादन केलेली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणांखालील मौजा गुंजखेडा येथील स.क्र. ४५५-अ (जुना स.क्र. २१४ भाग) चे ३१०० चौ.मी. क्षेत्राबाबत (यापुढे **"उक्त जमिनी"** असे संबोधिले आहे) संबंधित जमीनमालक यांनी (यापुढे **"उक्त जमीन मालक"** असे संबोधिले आहे) उक्त अधिनियमाचे कलम-१२७(१) चे तरतुदीनुसार उक्त समुचित प्राधिकरणावर दि. ०१/०७/२०२० रोजी सूचना (यापुढे **"उक्त सूचना"** असे संबोधिले आहे) बजाविली होती;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीनमालकांनी उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकानंतर उक्त नियोजन प्राधिकरणाने विहीत मुदतीत उक्त आरक्षणाखालील उक्त जमीन संपादित केली नाही अथवा, उक्त जमिनीचे भूसंपादन करण्यासंबंधी उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) चे तरतुदीनुसार आवश्यक ती उपाययोजना केलेली नाही;

आणि ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठाकडील रिट याचिका क्र. ५६११/२०२२ मध्ये (यापुढे **"उक्त रिट याचिका"** असे संबोधिले आहे) दि. २०/०७/२०२४ रोजीच्या आदेशात उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण उक्त अधिनियमाच्या कलम १२७ चे तरतुदीन्वये व्यपगत झाल्याबाबत आदेश पारीत केले आहेत;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगर परिषद, पुलगाव यांचेकडील पत्र क्र. ३१० दि.०२.०९.२०२४ अन्वये, उक्त आरक्षणांखालील उक्त जमिनीच्या भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांचेकडे सादर केला असून सदर भुसंपादन प्रकरणामध्ये पुढील कार्यवाही झाली नसल्याबाबत कळविले आहे. तसेच नगर परिषदेने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केलेली नसल्याचेही कळविले आहे;

आणि ज्याअर्थी, सहायक संचालक, नगर रचना, वर्धा शाखा, वर्धा यांचेकडील पत्र क्र. १६०५ दि.२५.०९.२०२४ अन्वये 'सदर प्रकरणी भूसंपादनाची प्रक्रिया विहित मुदतीत पूर्ण झालेली नसल्यामुळे उक्त अधिनियमाचे कलम -१२७ मधील तरतुदीनुसार सदर आरक्षण व्यपगत झाले असून प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम-१२७ (२) अन्वयेचे आदेश निर्गमित करण्यास हरकत वाटत नाही,' असे कळविले आहे;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगर परिषद, पुलगाव यांचेकडुन प्राप्त मौजा गुंजखेडा येथिल स.क्र. ४५५ (जुना स.क्र. २१४ भाग) या जमिनीचे मंजूर अभिन्यास नकाशाचे अवलोकन केले असता, सदर मंजूर नकाशामध्ये उक्त आरक्षणाने ३१०० चौ.मी. क्षेत्र बाधित होत असल्याचे दर्शविले असून सदर क्षेत्राकरीता स.क्र. ४५५-अ असे उक्त जमिन मालक यांचे मालकीचे नमूद असल्याचे अद्यावत ७/१२ उताऱ्यावरून निदर्शनास येते;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षणाबाबतची उपरोक्त नमूद वस्तुस्थिती पाहता, उक्त अधिनियमाचे कलम-१२७ (२) चे तरतुदीनुसार उक्त जमिनीचे क्षेत्रावरील उक्त आरक्षण व्यपगत झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील निर्णय क्र.टिपीएस-१८१३/३२११/ प्र.क्र.५०८/नवि-१३, दि.०१.१२.२०१६ अन्वये नियोजन प्राधिकरण असलेल्या सर्व नगर परिषदा / नगर पंचायती / जिल्हा परिषदा यांच्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम-१२७ (२) चे तरतुदीनुसार कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार कलम-१५१ चे तरतुदीनुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केले आहेत;

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाचे कलम-१२७ (२) चे तरतुदीनुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे, या आदेशाद्वारे पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाले आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे:-

उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलांच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नविन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे :-

## परिशिष्ट

| अ.क्र. | नगर परिषद मौजा, तालुका व जिल्हा | उक्त मंजूर विकास योजनेतील प्रस्ताव व वि.यो. अहवालानुसार अंदाजे क्षेत्र | जमिनीचा तपशील | उक्त आरक्षणातून व्यपगत झाले अंदाजे क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| १. | पुलगाव नगर परिषद मौजा गुंजखेडा, ता. देवळी, जि. वर्धा. | आ.क्र. २३ – "व्हेजिटेबल मार्केट व शॉपिंग सेंटर" एकुण अंदाजे क्षेत्र ३१०० चौ.मी. | सर्व्हे क्र. ४५५-अ (जुना स.क्र. २१४ भाग) | ३१०० |

**टिप**:- १. उक्त आरक्षणांतून मुक्त झालेल्या उक्त जमिनीच्या लगतच्या जमिनींवर उक्त मंजूर विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकांना उपलब्ध होईल.

२. उक्त आरक्षणांतुन मुक्त झालेल्या उक्त जमिनीचे क्षेत्र दर्शविणारा उक्त मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा हा मुख्याधिकारी, पुलगाव नगर परिषद, पुलगाव, जि. वर्धा यांच्या कार्यालयात, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

३. सदर आदेश संचालनालयाचे www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

(अविनाश भा. पाटील)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.